Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ७, अंक २] गुरुवार ते बुधवार, जानेवारी १४-२०, २०२१/पौष २४-३०, शके १९४२ [पृष्ठे ९, किंमत : रुपये १०.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक—अमरावती विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **भाग एक-शासकीय अधिसूचना :** नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार–अ, चार-ब व चार–क यांमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | नाही. |
| **संकीर्ण अधिसूचना :** नेमणुका इ. इ., केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | १-९ |
| **भाग एक-अ.—**(भाग चार-ब यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम याअन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | नाही. |

## शासकीय अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

नाही.

## संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५.

### जिल्हाधिकारी, यांजकडून

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक कावि-अका-भुसं-६२१-२०२०.—

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या बुलडाणा जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश “ उक्त अधिनियम ” असा केला आहे.) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून अधिसूचना क्रमांक २०४/२०२०, दिनांक १३ मार्च २०२० अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढलेली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन

केलेल्या जमिनीची अनुसूची-दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, बुलडाणा जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल कोणताही असल्यास विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे.

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदींन्वये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीन मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटूंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी “पुनर्वसाहत क्षेत्र” म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले असून पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे ;

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमांन्वये जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, खामगांव यांस पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची-एक

## जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक एलएक्यू-शेगाव-आरडी-६-भाग-२-शेगाव-०७-२०१९-२०.

गाव शेगाव, तालुका-शेगांव, जिल्हा बुलडाणा.

| जिल्हा तालुका गांव | स. नं. | मोजनी नुसार संपादित होणारे क्षेत्र | | | सोडून देण्यात आलेले जमिनीचे क्षेत्र | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वहीती | पोट खराब | एकूण | वहीती | पोट खराब | एकूण |
| (१) | (२) | | (३) | | | (४) | |
| | | | हे. आर | | | हे. आर | |
| बुलडाणा, शेगांव, शेगांव | ३१७/२ | ० ०४४१ | ०० | ० ०४४१ | ० | ० | ० |
| | एकूण . . | ० ०४४१ | ०० | ० ०४४१ | ० | ० | ० |

**संपादनाचे प्रयोजन** : शेगांव तिर्थक्षेत्र विकास आराखड्यात अंतर्गत आरडी.६ भाग-२ (गांधी खैक ते मुस्लीम कब्रस्तान) रस्ता रुंदीकरण व मजबुती करणाकरीता.

## अनुसूची-दोन

## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नांव :— शेगांव विकास आराखडा.

प्रकल्प कार्याचे वर्णन :— तिर्थक्षेत्र शेगांव विकास आराखड्या अंतर्गत मौ. शेगांव, ता. शेगांव, जि. बुलडाणा येथील रस्ता रुंदीकरण व मजबुतीकरणाचे कामाकरीता.

समाजाला मिळणारे लाभ :— या प्रकल्पामुळे तिर्थक्षेत्र शेगांव येथे येणा-या भाविक-भक्तांना रस्ता रुंदीकरणामुळे जाणे-येणे सोईचे होणार आहे.

## अनुसूची-तीन

## पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

-निरंक-

**अनुसूची-चार**

**पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश**

-निरंक-

**टीप :–** उक्त जमिनीच्या आराखड्याचे अभिलेख उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, खामगांव, यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

बुलडाणा :
दिनांक २४ डिसेंबर २०२०.

**एस. रामामुर्ती** (भाप्रसे),
जिल्हाधिकारी, बुलडाणा.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ६.

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक प्र.अ.-भू.सं.–लाभक्षेत्र-कली-कावि-१६०-२०२०.––

ज्याअर्थी, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) यांच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण ११-२०१४-प्र.क्र.७७-अ-२, दिनांक १९ जानेवारी, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड-अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या यवतमाळ जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यास यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त सार्वजनिक प्रयोजन" असा केला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते. ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोन मध्ये दिलेले आहे.

आणि म्हणून, उक्त अधिनियमाचे कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची-तीन मध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमूद करावीत) ;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची-चार मध्ये दिलेला आहे ;

आणि ज्याअर्थी,कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची-पाच मध्ये दिलेला आहे. (नियुक्ती करणे आवश्यक असेल तर, या अनुसूचीमध्ये तपशील नमूद करावा).

त्याअर्थी, आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम-११ च्या पोट-कलम (४) अनुसार कोणतीही व्यक्ती ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने, या तरतुदीचे बुध्दीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-यांकडून भरपाई दिल्या जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम-११ च्या पोट-कलम (५) अनुसार जिल्हाधिकारी, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उप-नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), रस्ते प्रकल्प, यवतमाळ जिल्हाधिकारी कार्यालय, यांना पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची-एक**

**जमिनीचे वर्णन**

भूसंपादन प्रकरण क्रमांक (नविन) ०१-४७-२०२०-२०२१ (जुना) ०४-४७-२०१५-१६, गाव तेलगव्हाण, तालुका दारव्हा, जिल्हा यवतमाळ.

| अ. क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | ८२ | २ ७८ |
| २ | ८१ | ० ५९ |
| ३ | ८९ | ० १८ |
| ४ | ८५ | ० २८ |
| ५ | ८५ | ० ४० |
| ६ | ८४ | ० ७० |
| | एकूण . . | ४ ९३ |

**अनुसूची-दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नाव | :— | तेलगव्हाण पाझर तलाव. |
| प्रकल्प कार्याचे वर्णन | :— | पाझर तलावाचे काम. |
| समाजाला मिळणारे लाभ | :— | या प्रकल्पाद्वारे २४९ हेक्टर जमिनीस सिंचनाचा फायदा होणार असून लाभक्षेत्रातील संबंधीत शेतक-यांना सिंचनासाठी फायदा करुन घेता येईल व त्यामुळे त्यांचे कृषी उत्पन्नात भर पडून जिवनमान उंचवणार आहे. जसेच भूगर्भातील पाण्याची पातळी वाढण्यास मदत होईल. |

**अनुसूची-तीन**

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे**

विस्थापनाची आवश्यकता नाही. सबब माहिती निरंक.

**अनुसूची-चार**

**पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश**

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणा-या अभिकरणाने दिलेला) सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश : दिनांक १३-०५-२०१५ चे राजपत्रात प्रसिद्ध महाराष्ट्र शासनाची अधिसूचना क्रमांक संकीर्ण ०१-२०१५-प्र.क्र. ३-अ-२, नुसार उक्त अधिनियमाचे कलम १० (क) नुसार सामाजिक प्रभाव निर्धारणाच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देण्यात आलेली आहे.

**अनुसूची-पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

| | |
|---|---|
| (अ) प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-याचे पदनाम :— | प्रशासक नियुक्तीची आवश्यकता नाही. |
| (ब) प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता :— | निरंक. |
| (क) ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे :— त्या अधिसूचनेचा तपशील | निरंक. |

**टीप** :— उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), लाभक्षेत्र प्रकल्प, यवतमाळ जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

यवतमाळ :
दिनांक ९ नोव्हेंबर २०२०.

**एम. देवेंदर सिंह,**
जिल्हाधिकारी, यवतमाळ.

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ७.

**उपविभागीय अधिकारी, यांजकडून**

**उताळी प्रकल्पाचे मुख्य कालव्यावरुन निघणा-या सस्ती वितरीकेवरील लघुपाट क्र. ७ करिता मौजे सस्ती, ता. पातुर, जि. अकोला येथील संपादित करण्यात येत असलेल्या खाजगी जमिनीची सरळ खरेदी करण्याबाबत पूर्वसूचना.**

क्रमांक उविअ-शिरस्तेदार-काવि-१९०९-२०२०.—

ज्याअर्थी, कार्यकारी अभियंता, जिगांव उपसा सिंचन विभाग, खामगांव, जि. बुलडाणा ह्यांचे वतीने उपविभागीय अधिकारी, काटेपूर्णा बॅरेज उपविभाग अकोला जि. अकोला जाहीर नोटीस प्रसिध्दीस देतात की,

पातुर तालुक्यातील मौजे सस्ती या गावातील सोबत प्रसिध्दीस दिलेल्या यादीतील जमीन धारकांना/मालकांना व नमूद केलेल्या शेत जमिनीशी ज्यांचा हितसंबंध आहे, अशा जमीनमालकांच्या शेतजमिनी/सरळ खरेदी-विक्री व्यवहाराने खाजगी जमिनीची खरेदी करण्याबाबत आक्षेप वजा हरकती असल्यास तसेच ज्यामध्ये सर्व बँक, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, वारस व इतर संबंधीत आदींचा समावेश आहे असे अधिकार अभिलेखावरुन दिसून येईल अशा सर्व व्यक्तींना ही जाहीर नोटीस प्रसिध्द दिनांकापासून १४ दिवसाचे आत लेखी स्वरुपात आवश्यक त्या दस्तऐवजासह कार्यालयीन वेळेत उपविभागीय अधिकारी काटेपुर्णा बॅरेज उपविभाग अकोला, जि. अकोला (मो. नं. ७४४७३०२०७४) येथे आक्षेप व हरकती असल्यास दाखल कराव्यात. सदर कालावधी नंतर येणा-या आक्षेप-हरकतींचा विचार केला जाणार नाही व सदरील जमिनीची सरळ खरेदी व्यवहार केल्या जाईल ह्याची नोंद घ्यावी. सोबत जमीनमालकांची त्यांचे ७/१२ नुसार गट/सर्व्हे नंबर निहाय खरेदी करावयाच्या क्षेत्रासह माहिती प्रसिध्दीस खाली दिली आहे.

**अनुसूची**

भूसंपादन सरळ खरेदी प्रकरण क्रमांक एलएक्यु-४७-सस्ती-१-२०२०-२०२१,

मौजा सस्ती, ता. पातुर, जिल्हा अकोला.

| अ.क्र. | मौजा व तालुका | गट क्र. | ७/१२ नुसार क्षेत्र | संपादन करावयाचे क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | | हे. आर | हे. आर |
| १ | मौजे सस्ती | ७०/३ | १ १२ | ० ०८ |
| २ | ता. पातुर | ७७/३ | १ ८४ | ० ०१ |
| | | | एकूण . . | ० ०९ |

अकोला :
दिनांक २० ऑक्टोबर २०२०.

**सु. ना. निखाडे,**
उपविभागीय अधिकारी,
काटेपूर्णा बॅरेज उपविभाग, अकोला.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ८.

**उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, यांजकडून**

**न्याय्य नुकसान भरपाई मिळण्याचा आणि भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक उविअ-शिरस्तेदार-कावी-१२९४-२०२०.—

ज्याअर्थी, न्याय्य नुकसान भरपाई मिळण्याचा आणि भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (ज्याचा उल्लेख पुढे “ उक्त अधिनियम ” असा करण्यात आला आहे) च्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्र. संकीर्ण ११/२०१४/प्र.क्र. ७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश “ उक्त अधिसूचना ” असा करण्यात आला आहे.) याद्वारे, असे अधिसूचित केले आहे की, उक्त

अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड-अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, अकोला जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यास यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यापुढे जिचा निर्देश " उक्त जमीन " असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त सार्वजनिक प्रयोजन " असा करण्यात आलेला आहे.) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोनमध्ये दिलेले आहे ;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदींन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ; आणि

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. ३८, दि. १३ मार्च, २०१५ अन्वये सिंचन प्रकल्पांना उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोन व तीन यांच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देण्यात आली असल्यामुळे या प्रकल्पासाठी सामाजिक प्रभाव निर्धारण करण्याची आवश्यकता उरलेली नाही ; आणि

ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची-पाचमध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी, आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (४) अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपुरःस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची, जिल्हाधिका-यांकडून भरपाई दिली जाणार नाही ;

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अनुसार जिल्हाधिकारी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश " उक्त नियम " असा करण्यात आलेला आहे) त्यांच्या नियम १० च्या उप नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमी अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे ;

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, अकोला यांनी दिनांक २७ जानेवारी २०१७ रोजी आदेशानुसार उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी डॉ. आर. जी. पुरी, उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, बाळापूर यांस पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची-एक
## जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक एलएक्यु-४७-बटवाडी खु.-१-२०१६-१७,
गाव बटवाडी खु, तालुका-बाळापूर, जिल्हा- अकोला.

| अ. क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | ६९ पैकी | २ ८७ |
| २ | ६९ पैकी | ० ४६ |
| ३ | ६९ पैकी | ० २४ |
| | एकूण . . | ३ ५७ |

**अनुसूची-दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नाव | :— | महानिर्मिती पारस औष्णिक विद्युत निर्मिती प्रकल्पाच्या बंधा-यातील बुडीतक्षेत्रात येणा-या मौजे बटवाडी (खु.), ता. बाळापूर, जि. अकोला येथील खाजगी जमीन भूसंपादनाबाबत. |
| प्रकल्पाच्या कार्याचे वर्णन | :— | महानिर्मिती पारस औष्णिक विद्युत निर्मिती प्रकल्पाच्या बंधा-यातील बुडीत क्षेत्राकरीता. |

**अनुसूची-तीन**

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे**

या प्रकल्पामुळे कोणतेही गाव बाधित होत नाही.

**अनुसूची-चार**

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. ३८ दिनांक १३ मार्च २०१५ अन्वये सिंचन प्रकल्पांना सामाजिक प्रभाव निर्धारणापासून सूट दिली असल्यामुळे सामाजिक प्रभाव निर्धारण करण्यात आलेले नाही. त्यामुळे त्याचा सारांश प्रकाशित करण्याच्या प्रश्न उद्‌भवत नाही.

**अनुसूची-पाच**

सदर प्रकरणी विस्थापन होत नसल्यामुळे व प्रशासकाची नेमणूक झालेली नसल्यामुळे माहिती. - निरंक -

बाळापूर :
दिनांक १९ ऑक्टोबर २०२०.

**डॉ. आर. जी. पुरी,**
भूसंपादन अधिकारी तथा,
उपविभागीय अधिकारी, बाळापूर.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ९.

**आयुक्त, वस्त्रोद्योग तथा अतिरिक्त निबंधक, सहकारी संस्था, यांजकडून**

**आदेश**

क्रमांक कार्या-६(४)-सुतगि-रामाससु-१४९-२०२१.—

महाराष्ट्र सहकारी सस्था अधिनियम, १९६० चे कलम २१ अन्वये आणि महाराष्ट्र शासन, कृषि व सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मुंबई, शासन निर्णय क्रमांक सीएजी-१०७१-२५१०९-सी-३, दिनांक २२-३-१९७२ आणि महाराष्ट्र शासन सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन आदेश क्रमांक सीएसएल-१४९३-११६२-सीआर-४७-१५-सी, दिनांक ७-८-१९९३ अन्वये मला प्राप्त झालेला अधिकारानुसार मी, डॉ. माधवी खोडे चवरे, आयुक्त, वस्त्रोद्योग आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य तथा अतिरिक्त निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, नागपूर याद्वारे राधाई मागासवर्गीय सहकारी सूतगिरणी मर्या., भंडारज, तालुका अंजनगाव सुर्जी, जिल्हा अमरावती सूतगिरणीचे विसर्जन करण्यात यावे अशी माझी खात्री झाली असल्याने या आदेशाच्या दिनांकापासून सूतगिरणीचे विसर्जन झाले असे समजण्यात येईल तसेच निगम निकाय (बॉडी कारपोरेट) म्हणून असण्याचे बंद होईल.

विसर्जित (नोंदणी रद्द) सूतगिरणीची सर्व मालमत्ता. चिजवस्तू कार्यवाही योग्य दावे, सर्व रेकार्ड अभिलेख व इतर दस्तऐवज, निबंधकाचे वतीने प्रादेशिक उपआयुक्त वस्त्रोद्योग नागपूर यांचे अभिरक्षेत व नियंत्राणखाली राहतील.

सदरचा आदेश मी, माझ्या सही शिक्क्यानिशी आज दिनांक ६ जानेवारी २०२१ रोजी निर्गमित करत आहे.

नागपूर :
दिनांक ६ जानेवारी २०२१.

**डॉ. माधवी खोडे चवरे,**(भा.प्र.स.)
आयुक्त, वस्त्राद्योग तथा
अतिरिक्त निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, नागपूर.

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १०.

## उपविभागीय दंडाधिकारी, यांजकडून

### फौजदारी प्र. क्र. सी. आर. पी. सी. १४४ (१) अन्वये आदेश

क्रमांक फौजदारी-कावि-१३५५-२०२०.—

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, मुंबई यांचे पत्र क्रमांक रानिआ-ग्रापनि-२०२०-प्र.क्र. ०१-का-८, दिनांक ११-१२-२०२० नुसार जिल्ह्यातील तसेच जळगांव जा. व संग्रामपूर तालुक्यातील ग्रामपंचायत निवडणूक कार्यक्रम जाहीर केला असून दिनांक ११-१२-२०२० ते १८-०१-२०२१ पर्यंत निवडणुकीची घोषणा केल्याच्या दिनांकापासून ते निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होण्याच्या दिनांकापर्यंत जळगांव जा. व संग्रामपूर तालुक्यातील निवडणूक कार्यक्रम जाहीर झालेल्या ग्रामपंचायता करीता आदर्श आचारसंहिता लागू झालेली आहे.

अपर जिल्हाधिकारी, बुलडाणा यांनी त्यांचे पत्र क्रमांक गृहविभाग कक्ष ४(४)-कावि-१२००-२०२०, दिनांक १७-१२-२०२० अन्वये आदर्श आचार-संहितेचा भंग होऊ नये या दृष्टिकोनातून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ लावणेबाबत निर्देशित केले आहे. त्या अनुषंगाने जळगांव जा. उपविभागातील, जळगांव जा. व संग्रामपूर तालुक्यातील होणा-या ग्रामपंचायत सदस्य निवडणुकीत कायदा व सुव्यवस्था व निवडणूक निर्भयपणे व नि;पक्षपातीपणे पार पाडण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे उपाययोजना अंमलात आणणे आवश्यक झाले असल्याचे माझे ठाम मत झाले आहे.

त्याअर्थी, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४(१) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार मी, कु. वैशाली देवकर, उपविभागीय दंडाधिकारी, जळगांव जा, खालीप्रमाणे असे आदेशित करीत आहे की, जळगांव जा. व संग्रामपूर तालुक्यातील निवडणूक असलेल्या ग्रामपंचायत निवडणुकीचे कालावधीत उमेदवारांना प्रचारावेळी त्यांचे वाहन ताफ्यात ०१ पेक्षा जास्त वाहन वापरता येणार नाही तसेच निवडणुकीचे प्रचारासाठी वापरावयाचे वाहनांची परवानगी संपूर्ण ग्रामपंचायात क्षेत्रासाठी संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडून घेणे आवश्यक राहील. प्रचार कार्यासाठी संबंधित निवडणूक अधिकारी यांच्याकडे नोंदणी न करण्यात आलेले कोणतेही वाहन प्रचार कार्यासाठी वापरता येणार नाही असे आदेशित करण्यात येत आहे. तथापी, हा आदेश मा. पंतप्रधान आणि इतर राजकीय व्यक्ती ज्यांना Z+ सुरक्षा प्रदान करण्यात आली आहे त्यांना लागू राहणार नाही.

(२) जळगांव जा. व संग्रामपूर तालुक्यातील निवडणूक असलेल्या ग्रामपंचायत मतदान केंद्रापासून २०० मीटरच्या आत कोणताही मंडप उभारण्यात आली असतील तेथे अशा मतदान केंद्राच्या ठिकाणी किंवा त्याच्या जागेत एकापेक्षा अधिक मतदान केंद्र उभारण्यात आली असतील तेथे अशा मतदान केंद्राच्या गटांसाठी त्या जागेच्या १०० मीटरचे अंतरापलीकडे उमेदवाराचा केवळ एकच मंडप असावा. तसेच मतदान केंद्र, धार्मिक स्थळे, दवाखाने आणि शैक्षणिक संस्था यांच्यापासून २०० मीटरच्या आत मंडप नसावा. उमेदवाराला ज्या ठिकाणी मंडप उभारावयाचा त्या ठिकाणी ३X४.५ फुटाचा एक बॅनर वापरता येईल. ज्या उमेदवाराला असे मंडप उभारावयाचे असतील अशा प्रत्येक उमेदवाराने त्याला ज्या मतदान केंद्रावर मंडप उभारावयाचे आहेत त्या मतदान केंद्राचे नांव, त्यांचे अनुक्रमांक याबाबतची लेखी माहिती संबंधित निवडणूक अधिका-यांना आगाऊ कळविणेत आली पाहिजे. असे मंडप उभारतांना स्थानिक प्राधिकरणाकडून लेखी परवानगी घेतली पाहिजे. मतदारांना मतदान यादीतील अनुक्रमांक देण्याच्या एकमेव प्रयोजनाकरीताच केवळ या मंडपाचा वापर करण्यात आला पाहिजे. अशा मंडपामध्ये कोणत्याही परिस्थितीत गर्दी करण्यास मुभा असणार नाही. मतदान केंद्रातून मत देऊन बाहेर पडलेल्या व्यक्तीस मंडपात येण्याची मुभा असणार नाही. मंडप सांभाळणा-या व्यक्तींनी मतदान केंद्राकडे जाणा-या मतदारांच्या मार्गास कोणताही अडथळा निर्माण करण्यास किंवा त्यांना दुस-या उमेदवारांच्या मंडपात जाण्यास बंदी घालीत आहे.

(३) जळगांव जा. व संग्रामपूर तालुक्यातील निवडणूक असलेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत सर्व राजकीय पक्षाने/संघाने/संस्थांने उमेदवार, प्रतिनिधी यांनी सार्वजनिक जागा, शासकीय व निमशासकीय कार्यालयाचे इमारत व जागेवरील लावलेली भिती पत्रके, फलक, पोस्टर्स, बॅनर्स, कट आऊट त्वरीत काढून टाकावीत तसेच खाजगी जागा, इमारतीवरील संबंधित जागा मालकाचे लेखी संमतीशिवाय लावलेली भितीपत्रके, फलक, पोस्टर्स, बॅनर्स, कट आऊटस त्वरित काढून टाकण्याबाबत आदेश करीता आहे.

(४) जळगांव जा. व संग्रामपूर तालुक्यातील निवडणूक असलेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत मतदानाचे दिवशी मतदान केंद्र व परिसरात जमाव करण्यास, मतदारांना घाबरविण्यास, मतदान करण्यास किंवा मतदान न करण्यास प्रवृत्त करणे, उमेदवाराच्या निवडणूक चिन्हाचे प्रदर्शन करणे,

मोबाईल फोन, कॉर्डलेस फोन, पेजर, वायरलेस सेट व इतर इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांचा वापर करणे. वाहनांचा प्रवेश, मतदान केंद्रामध्ये अनधिकृत प्रवेश यावर बंदी घालीत आहे.

(५) जळगांव जा. व संग्रामपूर तालुक्यातील निवडणूक असलेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत कोणत्याही ठिकाणी मतदान केंद्र, दवाखाना, धार्मिक स्थळे व शैक्षणिक संस्था यापासून २०० मीटरचे आत कोणताही राजकीय पक्ष, उमेदवार यांना तात्पुरते कार्यालय उभारण्यास बंदी घालीत आहे.

(६) जळगांव जा. व संग्रामपूर तालुक्यातील निवडणूक असलेल्या ग्रामपंचात निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया निवडणूक निर्णय अधिकारी, तहसील कार्यालय येथून होणार असल्याने तसेच तहसील कार्यालय तेथे सुरक्षा कक्ष व मतमोजणी केंद्र प्रस्तावीत असल्याने तहसील कार्यालयाच्या आवारात फक्त ०४ व्यक्तींना परवानगी राहील. तसेच मिरवणुकीने येत असल्यास निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयापासून १०० मीटर अगोदर मिरवणूक थांबविणे बंधनकारक राहील.

हा आदेश जळगांव जा. उपविभागातील जळगाव जा. व संग्रामपूर तालुक्यतील निवडणूक होऊ घातलेल्या सर्व ग्रामपंचायत करिता दि. २३-१२-२०२० ते १८-०१-२०२१ पर्यंत (निवडणूक प्रक्रिया होईपर्यंत) लागू राहील. तसेच दि. २३-१२-२०२० ते १८-१-०२१ या कालावधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कक्षात कोविड-१९ च्या मार्गदर्शक सूचनेनुसार ०४ पेक्षा जास्त व्यक्तींना प्रवेशास बंदी राहील, तथापि, हा आदेश सर्व मतदानाशी संबंधित अधिकारी, सर्व पोलीस अधिकारी, सुरक्षा पथकातील कर्मचारी, निवडणूक निरीक्षक यांना लागू राहणार नाही.

या आदेशाचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १८८ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

सदर आदेश माझे सही शिक्क्यानिशी दि. २३ डिसेंबर २०२० रोजी जारी केला आहे.

जळगाव जामोद :
दिनांक २३ डिसेंबर २०२०.

**कु. वैशाली देवकर,**
उपविभागीय दंडाधिकारी,
जळगाव जामोद.

अ.-एक-३ (१७००).

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.